म्हणजेच पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी फवारणी करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

वाढ संवर्धकाचा वापर :

जवस पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी व आर्थिक मिळकतीकरीता वाढीच्या अवस्थेत पहिली फवारणी म्हणजेच कळी लागण्याच्या किंवा फुलोरा अवस्थेत तसेच दुसरी फवारणी बोंडे लागण्याच्या किंवा भरण्याच्या अवस्थेत ७५ पीपीएम सॅलिसीलीक ॲसिड म्हणजेच ०.७५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

जवस पिकावरील प्रमुख किडी, रोग व त्यांचे व्यवस्थापन :

गादमाशी

उपाययोजना :

१) जवस पिकाची पेरणी ऑक्टोबर पहिन्यात पहिल्या पंधरवाड्यत करावी.

२) जवसावरील गादमाशीच्या व्यवस्थापनासाठी ८.७७ टक्के गादमाशी प्रादुर्भाव ही आर्थिक संकेत पातळी गृहीत धरून कळी अवस्थेपासून सुरवात करून १५ दिवसाचे अंतराने अझाडीरॅक्टीन ३०० पीपीएम ५० मि.ली. किंवा ॲसीटॅमीप्रीड २० एसपी



अलटरनेरिया ब्लाईट

उपाययोजना :

१) बीज प्रक्रिया -थायरम/कार्बेन्डाझीम ३ ग्रॅम प्रति किलो.

२) मॅन्कोझेब ०.२५ टक्के ची फवारणी करावी (२५ ग्रॅम + १० लिटर पाणी)

भूरी

उपाययोजना :

या रोगाचा प्रसार हवेव्दारे होतो. या रोगाचे नियंत्रणाकरीता पाण्यात मिसळणारी गंधकाची भुकटी २५ ग्रॅम किंवा कॅराथेन ५ मि.ली. १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करवी व दुसरी आवश्यकता भासल्यास १५ दिवसांनी करावी. भूरी रोगाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी ०.१ टक्के हेक्साकोनाझोल ची फवारणी किंवा ५० पीपीएम सॅलीसिलिक ॲसिडची बीज प्रक्रिया अधिक ५० पीपीएम सॅलीसिलीक ॲसडची फवारणी पेरणीच्या ३० आणि ४५ दिवसानंतर करावी.

मर

उपाययोजना :

बीज प्रक्रिया - थायरम - ३ ग्रॅम प्रति किलो किंवा ५ ग्रॅम/कि प्रति ट्रायकोडर्मा व्हिरीडी बियाण्यास चोळावे.

पीक काढणी : पिकाची पाने व बोंड्य पिवळ्या पडल्यावर पीक काढणीस योग्य समजावे. या पिकाची कापणी विळ्याच्या सहाय्याने करावी. कापणी झाल्यानंतर ४-५ दिवस वाळवून मळणी करावी व बी योग्य प्रकारे साठवून ठेवावे.

टिप : अनेक रसायनाचे एकत्र मिश्रण करून फवारणी करणे टाळावे व सुरक्षित फवारणी तंत्राचा अंगीकार करावा.

घडी पत्रिका क्र. : डॉ. पंदेकृवि/प्रकृ/१५९६/२०२५

जवस लागवड तंत्रज्ञान



डॉ. किशोर कि. झाडे
वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख

डॉ. प्रितम एन. चिरडे
विषय विशेषज्ञ
(कृषिविद्या)

श्री. नरेश पी. बुध्देवार
विषय विशेषज्ञ
कृषि हवामानशास्त्र)

श्री. पुष्पक ए. बोथीकर
विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण)

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषि विज्ञान केंद्र

सोनापूर-गडचिरोली

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३०१७

Email - kvksonapur@gmail.com

Website - www.kvkgadchiroli.in

जवस हे रबी हंगामातील महत्वाचे तेलबिया पीक असून त्याचा उपयोग तेल व धागा निर्मितीसाठी केला जातो. जवस तेलामध्ये ५८ टक्के ओमेगा-३, मेदाम्ल आणि अँटीऑक्सीडंट (Antioxidant) आहेत. त्यामुळे हृदयरोगाला कारणीभूत असलेले विकार, रक्तदाब, कालेस्ट्रॉल, ट्रायग्लिसराईडयाचे प्रमाण कमी होते. संधीवात सुसह्य होतो. मधुमेह आटोक्यात येतो. कर्करोग व इतर रोगांना प्रतिकार शक्ती निर्माण होते. म्हणून या बहुगुणी जवसाचे दैनंदिन आहारात घेणे उपयोगी ठरते.

हवामान : या पिकास थंड हवामान उपयुक्त असून हे पीक जिरायती आणि बागायती लागवडीस योग्य आहे. या पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी वेळेवर लागवड, सुधारीत वाणांचा वापर आणि किडी व रोगापासून संरक्षण या बाबींकडे काळजीपुर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. जवसापासून आपण घरच्या घरी खाण्यासाठी किंवा विक्रीकरीता काही पदार्थ तयार करू शकाते. जसे की, जवस चटणी व मुखवास जे आपण प्रतिदनि ०६ ग्रॅम खायला पाहिजे.

जमिनीची निवड व पूर्वमशागत : या पिकाकरीता मध्यम ते भारी, आलोवा टिकवून ठेवणारी जमीन निवडावी. हेक्टरी १० बैलगाड्या चांगले कुजलेले शेणखत टाकून व वखराच्या दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी जेणेकरून पेरणी सोपी जाईल व बियाण्याची उगवण चांगली होईल.

पेरणीची वेळ : या पिकाच्या वेळेवर पेरणीला फार महत्व आहे. वेळेवर पेरणी केली तर गादमाशी ही किड व मर या रोगाचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात आढळून येतो व उत्पन्नात वाढ होते. म्हणून कोरडवाहू पिकाची पेरणी ऑक्टोबरच्या महिल्या पंधरावाड्यत तर बागायती पिकाची पेरणी नोव्हेंबरच्या महिल्या आठवड्यपर्यंत करवी.

बीज प्रक्रिया : पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास कार्बेन्डाझिम २ ग्रॅम किंवा थायरम ३ ग्रॅम लावावे. त्यानंतर ३ तासांनी ॲझोटोबॅक्टर २० ग्रॅम व स्फुरद विरघळणारे जिवाणू २० ग्रॅम प्रति किलो बियाणे याची बीज प्रक्रिया करावी.

जवसाचे सुधारीत वाण व त्यांचे गुणधर्म

अ.क्र.	वाणाचे नाव	कालावधी (दिवस)	तेलाचे प्रमाण	हेक्टरी उत्पन्न (किलो)
१.	एनएल -९७	११५-१२०	४४ टक्के	६००-१२००
२.	पी.के.व्ही.- एलएल-२६०	१०५-११४	३८ टक्के	६००-१२०० (कोरडवाहू) ९००-१८०० (ओलिताखाली)

आंतरपिक : या पिकात जवस + हरभरा (४:२), जवस + करडई (४:२), जवस + मोहरी (५:१) या प्रमाणात घेता येते.

पेरणी : पेरणी मुख्यत्वे चाड्याच्या तिफणीने करावी. दोन ओलीतील अंतर ३० सें.मी. ठेवावे. पेरताना बियाणे योग्य खोलीत पडेल याची काळजी घ्यावी.

बियाण्याचे प्रमाण : १५ किलो प्रति हेक्टरी बियाणे वापरावे.

रासायनिक खताची मात्रा :

परिस्थिती	रासायनिक खताची मात्रा कि/हे.	लागणारे रासायनिक खत व द्यावयाची वेळ
कोरडवाहू	२५ किलो नत्र + २५ किलो स्फुरद	५४ किलो युरीया + १५६ सिंगल सुपर फॉस्फेट + १५ किलो गंधक पेरणीच्या वेळेस प्रति हेक्टरी द्यावे.
ओलीत	६० किलो नत्र + ३० किलो स्फुरद	१) पेरणीच्या वेळेस ६५ किलो युरिया + १८७ लि‍लो सिंगल सुपर फॉस्फेट + १५ लि‍लो गंधक प्रति हेक्टरी द्यावे. २) ४०-४५ दिवसांनी ६५ किलो युरिया पहिल्या ओलीता सोबत द्यावा.

सुक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर :

जस्त आणि बोरॉनची कमतरता असलेल्या जमिनीमध्ये जवस पिकाने अधिक उत्पादन व आर्थिक मिळकतीकरीता शिफारसीत खतमात्रेसह पेरणीनंतर ४५ दिवसांनी ०.५ टक्के झिंक सल्फेट (५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात) ०.३ टक्के बोरॅक्स (३ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात) यांची फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

ओलीत व्यवस्थापन :

या पिकास कमीत कमी दोन ओलीतांची आवश्यकता आहे. पहिले ओलीत पिक फुलोऱ्यावर असतांना म्हणजेच ४०-४५ दिवसांनी व दुसरे ओलीत ६५-७० दिवसांनी (बोंड्या धरण्याच्या वेळेस) द्यावे.

आंतरमशागत :

जवसाचे पीक पहिले ३० दिवस तणविरहीत ठेवले तर उत्पादनात वाढ होते. पेरणीनंतर २५ दिवसांनी पहिली डवरणी करणे आवश्यक आहे. तणांचा प्रादुर्भाव लक्षात घेता निंदन करावे.

जवस पिकाचे कोरडवाहू परिस्थितीत अधिक आर्थिक मिळकतीकरीता पेरणीनंतर ३० दिवसांनी निंदण करून त्यात तणांच्या अवशेषाचे आच्छादन करावे.

तण व्यवस्थापन :

जवस पिकात प्रभावी तण व्यवस्थापनाकरीता तसेच किफायतशीर व अधिक उत्पादनासाठी उगवण पश्चात तणनाशक क्लोडीनोफोप + मेटसल्फुरॉन मिथाईल ०.०६ + ०.००४ कि.ग्रॅ. क्रियाशील घटक प्रति हेक्टरी (४०० ग्रॅम प्रति हेक्टर) या तणनाशकाची उगवणीनंतर तण २ ते ३ पानाच्या अवस्थेत असतांना

